ePaper
# कीव्हवर रशियाने डागलेल्या नव्या हायपरसॉनिक अस्त्राचा वेध



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™



पान 2 वरुन...

पुणे बनणार नॉलेज इकोनॉमीचे राष्ट्रीय केंद्र

WWW.MAHAENEWS.COM । मंगळवार । दि. 26 मे 2026। पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## लपूनछपून काढतायेत दिवस, कुरिअरच्या माध्यमातून संवाद

# मोजतबा खामेनईना हत्येची भीती





**महाईन्यूज ।**
**इराण**

**इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा अमेरिका-इस्रायल २८ एप्रिल रोजीच्या हल्ल्यात मृत्यू झाला. याच हल्ल्यात अनेक बड्या इराणी अधिकारी आणि खामेनी यांच्या घरातील अनेक जवळच्या नातेवाईकांचा मृत्यू झाला. इराणचे सध्याचे सर्वोच्च नेते मोजतबा खामेनी हे देखील या दिवशी गंभीर जखमी झाल्याचे सांगितले जाते. मोजतबा यांच्या तब्येतीची सद्यस्थिती आणि त्याचे सद्यठिकाण याबाबत वारंवार विविध माहिती समोर येत असते.**

'सीबीएस' या अमेरिकी वृत्तपत्राने प्रसिद्ध केलेल्या वृत्तानुसार अत्यंत गोपनीय पद्धतीने मोजतबा खामेनी यांचा इराणी अधिकाऱ्यांबरोबर संवाद सुरु आहे. मोजतबा यांच्याशी थेट संवाद होत नसल्याने सध्या दोन्ही देशात सुरु असलेल्या वाटाघाटीत अडथळा येत असल्याचे वृत्त अमेरिकी अधिकाऱ्यांच्या हवाल्याने सीबीएसने दिले आहे. अंतिम करारावर निर्णय होण्यासाठी यामुळेच विलंब होत असल्याचे सांगितले जात आहे. अमेरिकेकडून पाठविण्यात आलेला प्रस्ताव मोजतबा खामेनी यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी वेळ लागतो आणि तिथून प्रतिक्रिया येण्यासाठी देखील विलंब होतो, असे या वृत्तात म्हटले आहे.

सर्वोच्च नेत्याकडून निधी मिळणाऱ्या या वृत्तपत्राने रिपोर्टमध्ये म्हटले आहे की, "कोणतीही तडजोड तेव्हाच होईल जेव्हा सर्वोच्च नेत्याच्या अटींचा पूर्णपणे सन्मान केला जाईल. काही मुद्द्यांचाही उल्लेख करण्यात आला आहे, ज्यात इराणच्या मागण्या आहेत. या रिपोर्टमध्ये इराणच्या लष्कराचे कौतुक करण्यात आले असून, इराणने ज्या पद्धतीने शत्रुला उत्तर दिले, ते जगभरातील विद्यापीठांमध्ये शिकवले गेले पाहिजे. रिपोर्टनुसार इराणने अमेरिकेसमोर चार अटी ठेवल्या आहेत. यात पहिली अट आहे अणऊर्जा कार्यक्रमाची! आतापर्यंत इराणने अणुऊर्जा क्षेत्रात जी प्रगती आणि संशोधन केले आहे, ते सुरक्षित ठेवले गेले पाहिजे.

इराणचे या युद्धात नुकसान झाले आहे, त्याची भरपाई द्यावी लागेल. इराणने तिसरी अट अशी ठेवली आहे की, पश्चिम आशियातून अमेरिकेने आपले पूर्ण सैन्य काढून घ्यावे.

### नेत्यांना हत्येची भीती

प्रमुख इराणी नेत्यांना हत्येची भीती असल्याने त्यांच्याकडून अधिक प्रमाणात काळजी घेतली जात आहे. अनेक बडे अधिकारी वास्तव्यासाठी बंकरची मदत घेत आहेत. तर, अनेकजण सार्वजनिक ठिकाणी उपस्थित राहण्यास टाळत आहेत. मोजतबा खामेनी देखील सुरक्षेचे अधिक खबरदारी घेत असल्याची माहिती विविध वृत्तांमधून समोर येत आहे. सुरक्षित नेटवर्कच्या मदतीने कुरिअरच्या माध्यामातून त्यांच्याशी संवाद साधला जात असल्याची माहिती सीबीएसच्या वृत्तातून आली आहे. शांतता कराराच्या बाबतीत अमेरिकेबरोबर कोणत्या गोष्टींवर चर्चा करावी आणि कोणत्या करु नये याची माहिती मोजतबा यांनी सहकाऱ्यांना दिल्याचे सीबीएसच्या वृत्तात म्हटले आहे.

### मोजतबा आहेत तरी कुठे?

मोजतबा खामेनी यांचे सद्यठिकाण आणि इराणी प्रशासन त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी वापरत असलेल्या यंत्रणेवर भाष्य करण्यास व्हाईट हाऊसने नकार दिला आहे. मोजतबा २८ फेब्रुवारीपासून गायब आहेत. अयातुल्ला खामेनी यांच्या मृत्यूनंतर मोजतबा देखील गंबीर जखमी झाल्याचे सांगितले. मोजतबा यांच्या जिवंत असण्याबाबत वारंवार प्रश्न उपस्थित केले जातात. कधी त्यांच्यावर रशियात प्लॅस्टिक सर्जरी करण्यात आल्याचे सांगितले जाते तर कधी ते कोमात असल्याचे वृत्त समोर येते, दरम्यान मोजतबा यांच्या सद्यस्थितीबाबत ठोस माहिती अद्याप समोर आलेली नाही.

# पुणे बनणार नॉलेज इकोनॉमीचे राष्ट्रीय केंद्र

## जीएसटी व प्राप्तिकर संकलनात आघाडीवर असलेले पुणे पुढील दशकात भारताचे ग्रोथ इंजिन ठरण्याची शक्यता

**महाईन्यूज । पुणे**

**जीएसटी, प्राप्तिकर, मालमत्ता कर भरण्यात मुंबई पाठोपाठ पुणे शहराचा क्रमांक लागतो. यंदा प्राप्तिकर विभागाने 98.5 वसुली करीत 1 लाख 33 हजार कोटी रुपयांची कर वसुली केली आहे. यात आयटी क्षेत्राचा मोठा वाटा आहे. त्यामुळे आगामी दहा ते पंधरा वर्षांत पुणे शहर 'नॉलेज इकोनॉमी'चे राष्ट्रीय केंद्र अर्थात देशाचे प्रमुख ग्रोथ इंजिन बनेल, असा निष्कर्ष अनेक आर्थिक सर्वेक्षण आणि अहवालात आला आहे.**




मात्र, शहरासमोर काही आव्हाने आहेत, ती पार केली तर शहराची विकास खूप वेगाने होईल, असे तज्ज्ञांचे मत आहे. पुणे शहरासह जिल्ह्याची आर्थिक वाढ गेल्या दशकात वेगाने झाली, तर आगामी दशकात ती प्रचंड वेग घेईल, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे.

याचे प्रमुख कारण म्हणजे माहिती तंत्रज्ञान, ऑटोमोबाईल, ग्लोबल कॅपॅबिलीटी सेंटर्स (जीसीसी), संरक्षण, संशोधन, शिक्षण, स्टार्टअप, आणि सेवा क्षेत्रामुळे पुणे हे देशातील प्रमुख आर्थिक केंद्र म्हणून पुढे येत आहे. विविध केंद्रीय संस्था, वित्तीय अहवाल, आणि कर संकलनाच्या आकडेवारीतून पुढील 10 ते 15 वर्षांत देशाचे ग्रोथ हब म्हणून पुढे येईल, असे तज्ज्ञांचे संकेत आहेत.

मुंबईनंतर सर्वाधिक प्राप्तिकर आणि जीएसटी संकलन करणारे शहर म्हणून पुण्याने देशाच्या आर्थिक नकाशावर आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. माहिती तंत्रज्ञान, उत्पादन उद्योग, वाहन उद्योग, सेवा व्यवसाय, ई-कॉमर्स आणि उच्च वेतनधारक कर्मचाऱ्यांमुळे पुण्याची अर्थव्यवस्था झपाट्याने विस्तारत आहे. गेल्या काही वर्षांत शहरातील आर्थिक व्यवहारांची वाढती व्याप्ती आणि उद्योगस्नेही वातावरणामुळे केंद्र सरकारच्या करसंकलनात पुण्याचा मोठा वाटा निर्माण झाला आहे. पुणे शहर आज केवळ शैक्षणिक केंद्र राहिले नसून, आयटी आणि स्टार्टअपची राजधानी म्हणूनही देशभरात ओळख मिळवत आहे. हिंजवडी, खराडी, बाणेर, मगरपट्टा आणि आयटी कॉरिडॉर परिसरात जागतिक दर्जाच्या कंपन्यांची मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक वाढत आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांनी येथे आपली कार्यालये आणि विकास केंद्रे उभारल्यामुळे उच्च उत्पन्न गटातील कर्मचाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. परिणामी निवासी, व्यावसायिक आणि सेवा क्षेत्रातील आर्थिक उलाढाल वाढून अप्रत्यक्ष करसंकलनातही मोठी भर पडत आहे.

एआय ऑटोमेशन, फिनटेक, डीपटेक आणि इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रातील स्टार्टअप्स पुण्यात वेगाने विकसित होत आहेत. नव्या तंत्रज्ञानावर आधारित उद्योगांना शहरात अनुकूल वातावरण मिळत असल्याने देश-विदेशातील गुंतवणूकदारांचे लक्ष पुण्याकडे वळले आहे. उच्च दर्जाचे अभियंते, संशोधन संस्था, तांत्रिक शिक्षण आणि उद्योग यांचे एकत्रित जाळे पुण्याला नव्या अर्थव्यवस्थेचे केंद्र बनवत आहे. चाकण औद्योगिक पट्टा देशातील सर्वांत मोठ्या ऑटो क्लस्टरपैकी एक म्हणून विकसित झाला आहे. इलेक्ट्रिक वाहन, रोबोटिक्स आणि आधुनिक उत्पादन तंत्रज्ञान क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत आहे.

### वाहन उद्योग, आयटी कंपन्यांमुळे पुण्याकडे जगाचे लक्ष

जागतिक दर्जाच्या कंपन्यांनी पुण्यात आपली उपस्थिती मजबूत केली आहे. मर्सिडीज-बेंझ, टाटा मोटर्स, बजाज ऑटो, फोक्सवॅगन यांसारख्या वाहन उद्योगांबरोबरच इन्फोसिस, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (TCS), विप्रो आणि ॲक्सेंचरसारख्या आयटी कंपन्यांमुळे पुण्याकडे जगाचे लक्ष वेधले गेले आहे. या कंपन्यांमुळे मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होत असून, शहराची अर्थव्यवस्था अधिक वेगाने विस्तारत आहे. शहरातील पायाभूत सुविधांमध्ये सुरू असलेली मोठी गुंतवणूकही पुण्याच्या विकासाला नवी दिशा देत आहे. रिंगरोड, नवीन विमानतळ, द्रुतगती मार्ग, लॉजिस्टिक पार्क आणि विस्तारणारी मेट्रो सेवा यामुळे शहराची कनेक्टिव्हिटी झपाट्याने वाढत आहे.

# व्हिस्टाडोम कोचला प्रवाशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; पुणे विभागाला 6.93 कोटींचा महसूल

**महाईन्यूज । पुणे**

**निसर्गाचे विहंगम दृश्य न्याहाळत रेल्वेप्रवासाचा आनंद देणाऱ्या व्हिस्टाडोम कोचला प्रवाशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पुणे विभागातून सुटणाऱ्या चार प्रमुख रेल्वेगाड्यांमधील व्हिस्टाडोम कोचला मागील आर्थिक वर्षात प्रवाशांच्या अभूतपूर्व प्रतिसादामुळे मध्य रेल्वेच्या तिजोरीत तब्बल 6 कोटी 93 लाख 6 हजार 84 रुपयांचा महसूल जमा झाला आहे.**



1 एप्रिल 2025 ते 31 मार्च 2026 या कालावधीत 61 हजारांहून अधिक प्रवाशांनी या आलिशान कोचमधून प्रवासाचा आनंद लुटला. मध्य रेल्वेच्या पुणे विभागाचे जनसंपर्क अधिकारी हेमंतकुमार बेहेरा यांनी दै. 'पुढारी'ला दिलेल्या माहितीतून हा यशाचा आलेख समोर आला आहे.

पुणे विभागातील डेक्कन एक्स्प्रेस, शताब्दी एक्स्प्रेस, डेक्कन क्वीन आणि प्रगती एक्स्प्रेस या चार गाड्यांना व्हिस्टाडोम कोच जोडण्यात आले आहेत. घाटमाथ्यावरील सौंदर्य, बोगदे आणि धबधबे जवळून अनुभवण्यासाठी पर्यटक आणि नियमित प्रवाशांची या कोचसाठी पहिली पसंती असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते.

या व्हिस्टाडोम कोचमधील मोठ्या काचेच्या खिडक्या, फिरणाऱ्या आरामदायी खुर्च्या आणि आधुनिक सुविधा प्रवाशांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहेत. विशेषतः पावसाळ्यात सह्याद्रीच्या निसर्गरम्य घाटमाथ्याचा अनुभव घेण्यासाठी या कोचला मोठी मागणी असते. पर्यटनासोबतच रेल्वे प्रवासाचा अनोखा अनुभव देणाऱ्या या सेवेमुळे पुणे विभागाच्या उत्पन्नातही लक्षणीय वाढ झाली आहे.

### प्रवासी व उत्पन्नाबाबत अव्वल ठरलेल्या गाड्या

प्रवासीसंख्येत प्रगती एक्स्प्रेसने बाजी मारली असून, वर्षभरात सर्वाधिक 16 हजार 327 प्रवाशांनी यातून प्रवास केला. मात्र, उत्पन्नाबाबतीत शताब्दी एक्स्प्रेसने इतर गाड्यांना मागे टाकत तब्बल 2 कोटी 92 लाख रुपयांची घसघशीत कमाई रेल्वेला करून दिली आहे. प्रवाशांच्या वाढत्या पसंतीमुळे प्रगती एक्स्प्रेसने प्रवासीसंख्येत अव्वल स्थान पटकावले आहे. दररोजच्या प्रवासासाठी सुरक्षित, वेळेवर आणि आरामदायी सेवा मिळत असल्याने प्रवाशांचा या गाडीवर मोठा विश्वास असल्याचे दिसून येते. दुसरीकडे, शताब्दी एक्स्प्रेसने प्रीमियम सुविधांच्या जोरावर उत्पन्नात विक्रमी कामगिरी करत रेल्वेच्या महसुलात मोठे योगदान दिले आहे.


> पुणे-मुंबई मार्गावरील बोरघाटाचे सौंदर्य प्रवाशांना आकर्षित करते. व्हिस्टाडोम कोचच्या फिरत्या खुर्च्या आणि काचेचे छत, काचेच्याच भव्य खिडक्या, यामुळे हा प्रवास अधिक आनंददायी होतो. प्रवाशांचा वाढता प्रतिसाद पाहता, हा रेल्वेचा एक यशस्वी प्रयोग ठरला आहे.
>
> **- हेमंतकुमार बेहेरा, जनसंपर्क अधिकारी, मध्य रेल्वे, पुणे विभाग.**

# एसआरए टीडीआर घोटाळ्याचा पर्दाफाश

## झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमध्ये हजारो कोटींच्या अनियमिततेचे गंभीर आरोप; चौकशीची मागणी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए) कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. या योजनांमध्ये गैरप्रकार करून हजारो कोटी रुपयांचे टीडीआर घोटाळे केले जात असल्याचे समोर आले आहे. प्रामुख्याने मागील तीन-चार वर्षांत एसआरएचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश गटने यांच्या कार्यकाळातील अनेक योजनांमध्ये अनियमितता झाल्याच्या तक्रारी आल्या आहेत.**



### जनता वसाहत झोपडपट्टीची पुनरावृत्ती

पुण्यातील जनता वसाहतीमध्ये एसआरए योजना राबविण्याच्या नावाखाली एसआरएचे सीईओ नीलेश गटने याने चुकीचा सर्व्हे नंबर दाखवून बिल्डरला 786 कोटींचा टीडीआर देण्याचा प्रस्ताव मंजूर केला होता. मात्र, दै. 'पुढारी'ने हा दरोडा उघडकीस आणत तो हाणून पाडला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दै. 'पुढारी'च्या वृत्तमालिकेची दखल घेऊन जनता वसाहत टीडीआरला स्थगिती देऊन चौकशीचे आदेश दिले आहेत. जनता वसाहत हे तर हिमनगाचे टोक ठरेल, अशा पद्धतीचे एसआरएतील गैरव्यवहार आता चव्हाट्यावर आले आहेत.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील झोपडीधारकांना हक्काची घरे देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने 2005 मध्ये एसआरए प्राधिकरणाची स्थापना केली. मात्र, गेल्या काही वर्षांत गोरगरीब झोपडपट्टीधारकांच्या नावाखाली काही बड्या बिल्डरांनी एसआरएला अक्षरशः 'टीडीआरची खाण' करून लुटण्याचे काम केल्याचे उघड झाले आहे. दै. 'पुढारी'कडे यासंबंधीच्या अनेक तक्रारी आल्या असून, त्यांच्या चौकशीत अनेक धक्कादायक बाबी उघड झाल्या आहेत. प्रामुख्याने एसआरएचे सीईओ नीलेश गटने यांच्या कार्यकाळातच अनेक प्रकरणांमध्ये अनियमितता, मनमानी आणि बिल्डरधार्जिण्या निर्णयांमुळे अनेक योजना आता वादाच्या भोवऱ्यात आल्या आहेत.

यामध्ये प्रामुख्याने पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील योजनांचा समावेश आहे. त्यात मिलिंदनगर, विठ्ठलनगर, अजिंक्यनगर या बीएसयूपीतून नंतर एसआरएकडे आलेल्या योजनेतही मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे आढळून आले आहे. तसेच, अजिंक्यनगर-निगडी, सॅनिटरी चाळ-पिंपरी, जाधववस्ती-रावेत, भोसरी एमआयडीसी प्लॉट आदी भागांत महापालिकेच्या आरक्षण क्षेत्रावर किंवा रिकाम्या जागांवर संगनमताने झोपड्या दाखवून योजना मंजूर केल्याच्या तक्रारी असून, या प्रक्रियेत कोट्यवधी रुपयांचा टीडीआर घोटाळा झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. याशिवाय पांडरकर चाळ-चिंचवड, कासारवाडी, जगताप चाळ-दापोडी यांसारख्या खासगी चाळींवरही झोपडपट्टी दाखवून योजना मंजूर करण्यात आल्याच्या तक्रारी आल्या असून, या सर्व प्रकरणांत मोठ्या प्रमाणावर टीडीआर वितरित करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. या सर्व प्रकरणांची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. झोपडपट्टी पुनर्वसनाच्या नावाखाली सर्वसामान्यांच्या हक्कांवर डल्ला मारत काही मोजक्या बिल्डरांना लाभ मिळवून देण्यात आल्याचा आरोप सामाजिक संघटनांकडून करण्यात येत आहे. अनेक योजनांमध्ये मूळ रहिवाशांना अद्याप घरे मिळालेली नसताना टीडीआरचा मोठ्या प्रमाणावर लाभ घेतल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे एसआरएच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, शासनाने या संपूर्ण प्रकरणात पारदर्शक चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

> " झोपडपट्टी पुनर्वसनाच्या ज्या योजनांमध्ये गैरव्यवहार अथवा अनियमितता झाल्याच्या तक्रारी आल्या आहेत. त्या सर्व योजनांची चौकशी केली जाईल. त्यात तथ्य आढळल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल.
>
> **- सतीशकुमार खडके, मुख्य कार्यकारी अधिकारी, एसआरए.**

# पिंपरी-चिंचवडमध्ये वाहतूक कोंडीचा कहर; महापालिकेच्या विकासकामांवर टीका

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने शहरातील बहुतांश अर्बन सिटी अंतर्गत विकासकामे सुरू आहेत. परंतु ही कामे म्हणजे अंगापेक्षा बोंगाच मोठा आशी असल्याची खोचक टीका नागरिक करत आहेत. या नियोजनशून्य कारभाराचा फटका शहरातील करदात्यांना बसत आहेत. बहुतांश प्रकल्प महापालिकेने राबविले परंतु ते जनतेच्या हितासाठी की ठेकेदार पोसण्यासाठी आशी चर्चा नागरिकांत सुरू आहे.**



### विरुद्ध दिशेने होतेय वाहतूक

पिंपरी मार्केट परिसरात बहुतांश भागात वनवे रस्ते आहेत. परंतु वाहनचालक वळसा मारण्यापेक्षा शॉर्टकट वापरतात. अनेकदा विरुद्ध दिशेने प्रवास करतात यामुळे वाहतुकीस अडथळा होऊन कोंडी होत आहे. पिंपरी चौकापासून ते साई चौकापर्यंत रस्त्यावर बसणाऱ्या फेरीवाल्यामुळे पदपथच गायब झाले आहेत. पादचारी नागरिकांच्या मते विकासकामे सुरू करण्यापूर्वी वाहतूक, रहदारी, वाहनतळ पर्याय मार्ग अतिक्रमण नियंत्रण ठेवणे आवश्यक होते. परंतु नियोजनात कमतरता असल्याने नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.

शहरातील बहुतांश रस्त्याची स्थिती आज विस्तृत पदपथ आणि अरुंद रस्ते आशी झाल्याने शहरवासीयांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.

शहरात सुरू असलेल्या खोदकामामुळे व लगीनसराईच्या धावपळीत पिंपरी शहरातील विविध रस्त्यांवर वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली आहे. यामुळे नागरिक हैराण झाले असून, महापालिकेच्या चुकीच्या धोरणामुळे शहरातील अनेक भागांत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. त्यात कित्येक तास नागरिकांना अडकून पडावे लागत आहे. दररोज सकाळी व सायंकाळी नागरिकांना अनेक वेळा वाहतुक कोंडीचा सामना करावा लागत आहे. सध्या शगुन चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पिंपरी चौक, मोरवाडी चौक, महावीर चौक, साई चौक, पुणेकडून काळेवाडीकडे जाणारा रस्त्यावर चारचाकी वाहने अनधिकृतपणे पार्क केली जात असल्याने वाहतूक कोंडी होत आहे.

शहरातील खराळवाडी, जामा मस्जिद, पिंपरी स्टेशन रोड, त्रैलोक्य स्मशानभूमी रस्ता, संजय गांधीनगर समोर पिंपरीकडे जाणाऱ्या रस्त्यावर अनेक भागात चालू असलेल्या रस्ते खोदकामामुळे अनेक रस्त्यांवर एका बाजूने वाहतूक रहदारीला मार्ग मोकळा केला आहे. मात्र, वर्दळीच्या चौकात वाहतूक रहदारीला अडथळा येतो अशा चौकात वाहने सावकाश चालवा किंवा हळूहळू सुलभपणे चालवणे या बाबतीत योग्य वाहनचालकांचे लक्ष वेधून घेणारे दिशा दर्शवणारी फलक, बॅरिकेड्स किंवा वाहतूक कंट्रोल करण्यासाठी पुरेशी साधने नसल्यामुळे बाहेरील ठिकाणाहून येणारे नागरिक हवालदिल होऊन जातात. याचा परिणाम अजून वाहतूक रहदारीला अडथळा निर्माण होऊन वाहतूक कोंडीचा फटका बसत आहे.

मॉलसमोरील अतिक्रमणे, हातगाडी, फेरीवाले यांना रस्त्यात बसून न देणे. चौकातील अनधिकृत रिक्षा स्टँड यांच्यावर कारवाई करणे गरजेचे आहे. तसेच मेट्रो व इतर कारणासाठी येणार्या नागरिकांना वाहनतळ उपलब्ध करून देणे त्यांची व्यवस्था करणे गरजेचे आहे.




**खासगी, विना अनुदानित व अल्पसंख्याक शाळांमधील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जनगणनेची कामे सोपविण्यास लगाम लावण्याचा मुंबई उच्च न्यायालयाचा आदेश जनगणनेच्या वेळापत्रकावर परिणाम करू शकतो. हा आदेश सगळीकडेच लागू होणार आहे.**

# कर्तव्याच्या 'सक्ती'ला लगाम



जनगणनेचा कायदा आणि शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदींचा आधार घेऊन खासगी शाळांमधील शिक्षकांनाही जनगणनेच्या कामांची सक्ती करण्याच्या सरकारी आदेशाला न्यायालयाने स्थगिती दिली आहे. हा आदेश सगळीकडेच लागू होणारा असल्याने देशभरातील खासगी शाळांतील शिक्षकांना दिलासा मिळेल. सरकार याविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार असले, तरी तेथे हाच आदेश कायम राहिल्यास या कामात अडचणी उभ्या राहू शकतात. एकीकडे शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा बोजा; तर दुसरीकडे जनगणनेचे राष्ट्रीय कर्तव्य असा हा पेच असून, दोन्ही घटकांच्या भूमिकांमध्ये काही प्रमाणात तथ्य आहे. आता वरिष्ठ पातळीवरून हा तिढा सोडवण्याची वेळ आली आहे; मात्र त्यासाठी केवळ मनमानी परिपत्रकांचा मारा किंवा शिक्षकांवर फौजदारी कारवाईचा बडगा उगारण्याची भूमिका घेण्याऐवजी सर्व बाजूंचा साकल्याने विचार करण्याची आणि सर्व घटकांना विश्वासात घेण्याची गरज आहे.

शिक्षण हक्क कायद्यानुसार शिक्षकांवर अशैक्षणिक कामांची सक्ती करता येत नाही; मात्र निवडणूक आणि जनगणनेच्या कामांचा त्यात अपवाद केला आहे. जनगणनेची कामे करण्यासाठी स्वतंत्र कर्मचारीवृंद नसल्यामुळे ही राष्ट्रीय कामे करायची कोणी, हा प्रश्न उद्भवतो. सरकारच्या वतीने हाच मुद्दा सुनावणीत मांडण्यात आला होता. मात्र, उच्च न्यायालयाने या तरतुदींच्या मर्यादा निदर्शनास आणून दिल्या आहेत. कायद्यातील या तरतुदी सरकारी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर्मचारी किंवा सरकारी-अनुदानित शाळांमधील शिक्षकांनाच लागू होतात; खासगी आणि विना अनुदानित शाळा या 'स्थानिक प्रशासना'च्या व्याख्येत येत नाहीत, असे न्यायालयाने म्हटले आहे; तसेच या शिक्षकांच्या वेतनासाठी सरकार पैसे देत नाही. त्यामुळे अशी सक्ती म्हणजे स्वायत्तता आणि शिक्षण देण्याच्या कामाच्या हक्कांतील हस्तक्षेप आहे, हा शिक्षक संघटना आणि शाळांचा युक्तिवाद न्यायालयाने मान्य केला आहे. त्यामुळे 'हे काम नाकारताच येणार नाही,' या सरकारी समजुतीला सध्या तरी धक्का बसल्याचे दिसते. पुढील सुनावणी ३१ जुलै रोजी होईल. तोवर सर्वोच्च न्यायालयाने या स्थगिती आदेशात बदल न केल्यास सध्याच्या टप्प्यावरील जनगणनेच्या कामासाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती कोठून करणार, हा प्रश्न सोडवावा लागेल. शिक्षक संघटनांनी या निर्णयाचे स्वागत करत शिक्षणाच्या गुणवत्तेवर लक्ष केंद्रित करण्याची मागणी केली आहे. वारंवार अशैक्षणिक कामे दिल्यामुळे विद्यार्थ्यांच्या अध्यापनावर परिणाम होत असल्याची भूमिका त्यांनी मांडली.

## प्रासंगिक »

### कोल्हा आणि कासव

**एकदा एका जंगलात एक कोल्हा राहत होता त्याला स्वतःच्या हुशारी बद्दल गर्व होता. तो म्हणत असे, "मी सर्व प्राण्यात हुशार आहे.**


एक दिवस तो अन्नाच्या शोधात निघाला. त्याला काही मिळाले नाही. त्याला भूक सहन झाली नाही. अखेर त्याला एक कासव दिसले. त्याला खुप आनंद झाला. त्याने उडी मारून कासवाला पकडले. कोल्ह्याने कासवाचे कवच फोड-ण्याचा प्रयत्न केला. पण ते काही फुटेना. कासव धुर्तपणे म्हणाले, "तु मला पाण्यात का बुडवत नाहीस? म्हणजे माझे कवच मऊ होईल व मला तु सहजपणे खाऊ शकशील." भुकेने व्याकुळ झालेल्या को-ल्ह्याने, काही विचार न करता कासवाला तळ्यात ढकलले.

कासव कोल्ह्याच्या हातातून सहज निसटले व आनंदाने पाण्यात पोहू लागले. ते तळ्याच्या मध्यभागी गेले आणि म्हणाले, "कोल्ह्या स्वतःला फार हुशार समजू नकोस."

तात्पर्य - जसे पेराल तसेच उगवेल किवा जशास तसे.

आपले नाव, जन्मतारीख, पत्ता, मोबाइल क्रमांक, आपले बँक तपशील अशी वैयक्तिक माहिती आपण अनेक ठिकाणी देत असतो.

# माहिती व निर्णयस्वातंत्र्य



माहिती दिल्यानंतरच्या काही काळातच आपल्याला अनोळखी क्रमांकांवरून दूरध्वनी येऊ लागतात, संदेश येतात आणि आपल्या सवयी, आवडीनिवडींनुसार जाहिरातीही दिसू लागतात. हा निव्वळ योगायोग नसतो. दिलेली माहिती कुठेतरी साठवली जाते आणि तिचा वापरही केला जातो. मग प्रश्न उभा राहतो, आपली माहिती कशी वापरली जाते, यावर आपले काही नियंत्रण आहे का? या प्रश्नाचे उत्तर 'गोपनीयतेचा अधिकार' या संकल्पनेत दडलेले आहे. गोपनीयतेचा अधिकार म्हणजे माहिती दडवणे नव्हे. एखाद्या वेळी माहिती देणे अपरिहार्य असते; पण ती कशी, कुणासाठी आणि कोणत्या मर्यादेत वापरली जाईल, यावर व्यक्तीचे नियंत्रण असणे, हाच या अधिकाराचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे हा अधिकार नक्की काय आहे, त्याअंतर्गत आपल्याला आपल्याच माहितीवर नियंत्रण मिळते का, या बाबी समजून घेणे आवश्यक आहे.

गोपनीयतेचा स्वतंत्र मूलभूत अधिकार राज्यघटनेत अंतर्भूत नसल्याचा स्पष्ट निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने सन १९५४मध्ये एम. पी. शर्मा आणि १९६२मध्ये खडकसिंग प्रकरणात दिला होता. मात्र, पुढील काळात न्यायालयाचा दृष्टिकोन हळूहळू बदलत गेला. व्यक्तीच्या खासगी आयुष्यातील हस्तक्षेपाबाबत न्यायालयाने काही प्रकरणात चिंता व्यक्त केली. मात्र गोपनीयतेच्या अधिकाराला 'मूलभूत अधिकार' म्हणून स्पष्ट मान्यता दिली नव्हती. पुढे आधार योजनेविरुद्ध दाखल झालेल्या याचिकेच्या निमित्ताने हा प्रश्न ऐरणीवर आला आणि त्यातूनच या अधिकाराला मान्यता मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.

आधार योजनेअंतर्गत नागरिकांच्या बोटांचे ठसे, आयरिस स्कॅन यासारखी बायोमेट्रिक माहिती मोठ्या प्रमाणावर जमा केली जाऊ लागली. ती माहिती रेशन, बँक खाते, मोबाइल सिम अशा विविध सेवांशी जोडली जाऊ लागली. या माहितीची सुरक्षा व नियंत्रण यांविषयी अनेक प्रश्न निर्माण झाले. ही योजना गोपनीयतेच्या अधिकाराचा भंग करते म्हणून तिला आव्हान देणारी याचिका माजी न्यायमूर्ती के. एस. पुट्टस्वामी यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली. सर्वप्रथम गोपनीयतेचा अधिकार हा मूलभूत अधिकार आहे का, हे ठरवणे आवश्यक असल्याने प्रकरण नऊ न्यायमूर्तींच्या घटनापीठाकडे वर्ग करण्यात आले.

## ।। अभंगवाणी ।।



ओलें मूळ भेदी खडकाचें अंग ।
आभ्यासासी सांग कार्यसिद्धी ॥१॥

नव्हे ऐसें कांहीं नाहीं अवघड ।
नाहीं कईवाड तोंच वरि ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# एमपीएससीच्या दिरंगाईमुळे नियुक्ती रखडली

## राज्यसेवा परीक्षेत उत्तीर्ण ७६ उमेदवारांची शिफारस पत्रे रखडली; उमेदवारांमध्ये अस्वस्थता!

**महाईन्यूज । मुंबई**

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या राज्यसेवा परीक्षा २०२४ चा अंतिम निकाल लागून दीड महिना उलटला तरी, निरीक्षण अधिकारी (पुरवठा) या पदासाठी निवड झालेल्या ७६ उमेदवारांची शिफारस पत्रे अद्याप प्रलंबित आहेत. इतर सर्व संवर्गातील उमेदवारांना शिफारस पत्रे मिळून त्यांची नियुक्ती प्रक्रिया सुरू झाली असताना, पुरवठा विभागाच्या उमेदवारांना मात्र अजूनही प्रतीक्षेत ठेवण्यात आले आहे. आयोगाच्या या भूमिकेमुळे उमेदवारांमध्ये अस्वस्थता आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.**




राज्यसेवा परीक्षा ही बहुविभागीय स्वरूपाची असल्याने विविध संवर्गातील पदांची भरती प्रक्रिया एकत्रित राबवली जाते. आयोगातर्फे या परीक्षेची अंतिम निवड यादी ८ एप्रिल २०२६ रोजी जाहीर करण्यात आली. त्यानंतर अवघ्या काही दिवसांत, म्हणजेच ३० एप्रिल २०२६ पासून इतर सर्व विभागांच्या उमेदवारांसाठी नियुक्ती प्रक्रियेला सुरुवात झाली. त्यानुसार उपजिल्हाधिकारी, सहाय्यक राज्य कर आयुक्त, पोलीस उपअधीक्षक,गटविकास अधिकारी अशा १८ संवर्गातील ३८७ उमेदवारांची शिफारस झाल्यानंतर त्यांच्या नियुक्तीच्या दृष्टीने पुढील प्रक्रिया सुरू झाली आहे. मात्र, निरीक्षण अधिकारी (पुरवठा) या संवर्गातील ७६ उमेदवारांची शिफारस पत्रे आयोगाकडून संबंधित विभागाला पाठवण्यात आलेली नाहीत. त्यामुळे या उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी, वैद्यकीय चाचणी आणि पर्यायाने नियुक्ती रखडली आहे.

२९ डिसेंबर २०२३ रोजी राज्यसेवा २०२४ परीक्षेची जाहिरात आली होती. त्यानंतर पूर्व, मुख्य आणि मुलाखती असे सर्व टप्पे पार पाडून तब्बल अडीच वर्षांनंतर उमेदवारांची अंतिम निवड झाली. एवढा संघर्ष करूनही नियुक्ती रखडल्याने उमेदवारांचा हा एकप्रकारे मानसिक छळ असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. २९ डिसेंबर २०२३ रोजी या परीक्षेची जाहिरात प्रसिद्ध झाली होती. त्यानंतर १ डिसेंबर २०२४ रोजी पूर्व परीक्षा पार पडली. निरीक्षण अधिकारी (पुरवठा) पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांमध्ये प्रचंड नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. इतर विभागांच्या नियुक्ती प्रक्रिया वेगाने सुरू असताना केवळ या संवर्गातील उमेदवारांना प्रतीक्षा करावी लागत असल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

### 'ढिसाळ' नियोजनाचा हा जबरदस्त फटका?

भरती प्रक्रियेला जवळपास अडीच वर्षे लोटल्याने आणि अनेक अग्निदिव्य पार पाडूनही प्रत्यक्ष नियुक्तीला कमालीचा विलंब होत आहे. या प्रशासकीय दिरंगाईमुळे निवड झालेल्या उमेदवारांमध्ये आता तीव्र संताप व्यक्त होत आहे. या विलंबाविरोधात आक्रमक झालेल्या संबंधित उमेदवारांनी अखेर एमपीएससीला निवेदन सादर केले आहे. सर्व संवर्गातील उमेदवारांना समान न्याय मिळावा आणि आमची शिफारस पत्रे तात्काळ निर्गमित करावीत, अशी मागणी या उमेदवारांनी निवेदनाद्वारे केली आहे. वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून ठोस प्रतिसाद मिळत नसल्याने उमेदवारांमध्ये अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे. लवकरात लवकर नियुक्ती प्रक्रिया पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही उमेदवारांनी दिला आहे.

### लांबलचक प्रवासाचा शेवट कधी?

पूर्व परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची २७ ते २९ मे २०२५ या कालावधीत मुख्य परीक्षा घेण्यात आली. मुख्य परीक्षेचा निकाल लागल्यानंतर १७ सप्टेंबर ते ३० ऑक्टोबर २०२५ या कालावधीत मुलाखतीचे टप्पे पार पडले. यानंतर ५ जानेवारी २०२६ रोजी आयोगाने गुणवत्ता यादी जाहीर केली, तर ८ एप्रिल २०२६ रोजी अंतिम निवड यादी प्रसिद्ध करण्यात आली. या अंतिम निवड यादीच्या अनुषंगाने ३० एप्रिल २०२६ पासून अन्य १८ संवर्गातील पदांची नियुक्ती प्रक्रिया वेगाने सुरू झाली असली, तरी पुरवठा निरीक्षण अधिकारी पदाच्या उमेदवारांची शिफारस मात्र अद्याप रखडलेलीच आहे. त्यामुळे या पदांच्या नियुक्तीला कधी मुहूर्त लागेल असा सवाल उपस्थित केला जात आहे.

## ‘राजकारण उद्योगपतींच्या हातात, नगरसेवकांना १५ लाखांचा रेट’; विजय वडेट्टीवार

**महाईन्यूज । अलिबाग**

**“राजकारण आणि समाजसेवा आता प्रामाणिकपणे उरलेली नाही. संपूर्ण राजकारण आता उद्योगपती आणि ठेकेदारांच्या हातात जात असून, भविष्यात विधिमंडळात सामान्य माणूस कुठेच दिसणार नाही,” अशी सरकार वर टीका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी पत्रकार परिषदेत केली. त्यांनी राज्य व केंद्र सरकारवर कडाडून टीका केली.**



### १०० कोटींची निवडणूक; नगरसेवकांना १५ लाख रुपयांचा ‘रेट’

वडेट्टीवार यांनी निवडणुकांमधील धनशक्तीचा पर्दाफाश करताना सांगितले की, “सध्या निवडणुकीच्या नावाखाली पळापळीचा उत्सव सुरू आहे. २०१४ पासून सर्वांनाच लागलेली ही वाईट सवय असून, काही नगरसेवकांना उचलण्यासाठी आधीच ५-५ लाख रुपये दिल्याचा आकडा माझ्याकडे आहे. आता तर हा ‘रेट’ १५ लाख रुपयांवर गेला आहे. एका मतासाठी १५ लाख रुपये दिले जात असतील, तर भविष्यात लोकशाही शिल्लक राहील का? ही निवडणूक तब्बल १०० कोटींची झाली असून, आमच्यासारख्या सामान्य लोकांच्या आवाक्याबाहेरची आहे. भाजपमध्ये अंतर्गत प्रचंड वाद असून त्यांच्या पक्षाचे १०० पेक्षा जास्त नगरसेवक आमच्या संपर्कात आहेत.”

“जे नगरसेवक काँग्रेस पक्षाचा आदेश (व्हीप) झुगारून जातील, त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल. त्यांचे सदस्यत्व रद्द केले जाईल आणि पुढील ६ वर्षांसाठी ते निवडणूक लढवण्यास अपात्र ठरतील,” असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

देशातील इंधन तुटवड्याला केंद्र सरकारची चुकीची धोरणे कारणीभूत असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला. “अमेरिकेने भारतावर इराण आणि रशियाकडून तेल खरेदी न करण्याचा फतवा लादला आहे. तेल कितीही महाग असले तरी कॅलिफोर्नियाकडूनच खरेदी करावे लागत आहे. लोकांमध्ये असंतोष पसरू नये म्हणून सरकार एकदम पैसे न वाढवता रोज १-२ रुपये वाढवत आहे. पुढील महिनाभरात पेट्रोल १५० रुपये आणि डिझेल १४० रुपयांवर जाईल. यामुळे महाराष्ट्रातील शेतकरी आणि सर्वसामान्य माणूस पूर्णपणे उद्ध्वस्त होईल,” अशी भीती त्यांनी व्यक्त केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदींवर थेट हल्ला चढवताना वडेट्टीवार म्हणाले, “पंतप्रधानांचे सामान्य लोकांना काटकसरीचे आवाहन हे फक्त गरीब आणि मध्यमवर्गीयांसाठीच होते, मोठ्या उद्योगपतींसाठी नव्हते. एफस्टीन फाईल आणि अदानी प्रकरणामुळे देश अमेरिकेच्या लावणीला बांधला गेला आहे. डोनाल्ड ट्रम्प म्हणतात की मोदींना कधी आणि कुठे फोन करावा हे बरोबर माहिती आहे. याचा अर्थ भारताच्या पंतप्रधानांचा हात अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी दगडाखाली ठेवला आहे आणि तो त्यांना काढता येत नाहीये.”

राज्यातील कायदा व सुव्यवस्थेवर बोट ठेवत ते म्हणाले की, “सध्या महाराष्ट्रात आरोपींना पाठीशी घालणे आणि त्यांच्याकडूनच प्रोटेक्शन घेऊन पैसे उकळण्याचा धंदा जोरात सुरू आहे. महाराष्ट्रात आता कायद्याचे राज्य राहिलेले नसून ‘काय द्यायचं’ भ्रष्टाचाराचे राज्य सुरू आहे,” असा टोला त्यांनी शेवटी लगावला. काँग्रेस उमेदवाराबाबत बोलताना ते म्हणाले की, “आमचा उमेदवार अद्याप ठरलेला नाही.

# तमिळनाडूमध्ये मोठी राजकीय उलथापालथ!

## 'AIADMK' च्या ३ आमदारांचे राजीनामे; जोसेफ विजय यांच्या 'TVK' पक्षात प्रवेश; राजकारणात मोठा भूकंप

**महाईन्यूज । तमिळनाडू**

**तमिळनाडूच्या राजकारणातून एक मोठी बातमी समोर येत आहे. विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर अंतर्गत वादाचा सामना करणाऱ्या 'एआयएडीएमके' (AIADMK) पक्षाला पुन्हा एकदा मोठा धक्का बसला आहे. पक्षाचे सर्वेसर्वा एडापट्टी पलानीस्वामी (EPS) यांच्याविरोधात बंड पुकारत AIADMK च्या तीन आमदारांनी आपल्या आमदारकीचा राजीनामा दिला असून, त्यांनी मुख्यमंत्री थलपती विजय यांच्या 'तमिळगा वेट्री कळघम' (TVK) पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला आहे.**

मरागतम कुमारवेल, जयकुमार आणि सत्यभामा अशी या तीन आमदारांची नावे आहेत. या तिन्ही आमदारांनी तामिळनाडू विधानसभेचे अध्यक्ष जे.सी.डी. प्रभाकर यांच्याकडे आपले राजीनामे सुपूर्द केले असून, अध्यक्षांनी ते त्वरित मंजूरही केले आहेत.

काही दिवसांपूर्वीच ज्येष्ठ नेते सी.व्ही. शन्मुगम यांच्या नेतृत्वाखाली AIADMK च्या ३० आमदारांनी मुख्यमंत्री विजय यांच्या 'टीव्हीके' सरकारला पाठिंबा दिला होता. त्यानंतर घडलेली ही घडामोड पलानीस्वामी यांच्यासाठी अत्यंत चिंताजनक मानली जात आहे. राजीनामा दिलेले हे तिन्ही आमदार AIADMK च्या बंडखोर गटातील होते. विशेष म्हणजे, धारापुरम आणि पेरुंदुराई हे दोन्ही मतदारसंघ पश्चिम तामिळनाडूतील 'कोंगु' भागात येतात, जो AIADMK चा पारंपरिक बालेकिल्ला मानला जातो. याच बालेकिल्ल्याला आता मुख्यमंत्र्यांच्या पक्षाने सुरुंग लावला आहे. राजीनामा दिल्यानंतर लागलीच या तिन्ही नेत्यांनी टीव्हीके (TVK) सरकारमधील मंत्री आधाव अर्जुन यांची भेट घेतली.

१३ मे रोजी तामिळनाडू विधानसभेत झालेल्या बहुमत चाचणीदरम्यान AIADMK च्या २५ बंडखोर आमदारांनी पक्षाचा 'व्हीप' (अडचणीच्या वेळी पक्षादेश) धुडकावून मुख्यमंत्री विजय यांच्या सरकारच्या बाजूने मतदान केले होते. आज राजीनामा दिलेले तिन्ही आमदार याच २५ बंडखोरांपैकी होते.



### ५ आमदार पुन्हा पलानीस्वामींच्या गटात

एकीकडे ३ आमदारांनी राजीनामा दिला असताना, दुसरीकडे बंडखोर गोटात मोठी फूट पडल्याचे पाहायला मिळत आहे. गेल्या काही दिवसांत ५ बंडखोर आमदारांनी पलानीस्वामी यांचे नेतृत्व पुन्हा स्वीकारत मूळ पक्षात घरवापसी केली आहे. यामध्ये आर्कोटचे आमदार एस.एम. सुकुमार यांचा समावेश आहे. या राजकीय उलथापालथीमुळे पलानीस्वामी यांच्या पाठीशी असलेल्या आमदारांची संख्या आता २७ झाली आहे. तर दुसरीकडे, ३ आमदारांच्या राजीनाम्यामुळे आणि ५ आमदारांच्या घरवापसीमुळे बंडखोर गटाची ताकद २५ वरून थेट १७ वर घसरली आहे.

### तामिळनाडू विधानसभेचे सध्याचे गणित

नुकत्याच झालेल्या तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत अभिनेते ते नेते बनलेल्या विजय यांच्या 'टीव्हीके' (TVK) पक्षाला सर्वाधिक १०८ जागा मिळाल्या होत्या. मात्र, बहुमताचा आकडा गाठता न आल्याने त्यांनी काँग्रेस, IUML, VCK आणि डाव्या पक्षांच्या पाठिंब्याने सरकार स्थापन केले. दुसरीकडे, AIADMK ला या निवडणुकीत अवघ्या ४७ जागांवर समाधान मानावे लागले होते. मात्र, असे असतानाही आज झालेल्या तीन आमदारांच्या राजीनाम्यामुळे तामिळनाडूच्या राजकारणात 'पिक्चर अभी बाकी है' हेच स्पष्ट होत आहे.

# कीव्हवर रशियाने डागलेल्या नव्या हायपरसॉनिक अस्त्राचा वेध

**महाईन्यूज । रशिया**

**रशिया- युक्रेन युद्धाने आता भीषण वळण घेतले असून, रशियाने पुन्हा एकदा सर्वात घातक 'ओरेश्निक' (ORESHNIK) हायपरसॉनिक बॅलिस्टिक क्षेपणास्त्राचा वापर कीव्हवर केला. या हल्ल्यामुळे संपूर्ण युरोपमध्ये चिंतेचे वातावरण पसरले असून, रशियाचे हे अस्त्र नेमके किती शक्तिशाली आहे, याची चर्चा जगभर सुरू झाली आहे.**



रविवारी २४ मे रोजी रशियाने युक्रेनची राजधानी कीव्हवर मोठ्या प्रमाणावर क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले केले. या हल्ल्यांमध्ये किमान चार जणांचा मृत्यू झाला, तर अनेक जण जखमी झाले. रशियाने पुन्हा एकदा 'ओरेश्निक' (Oreshnik) या अण्वस्त्रवाहू हायपरसॉनिक बॅलिस्टिक क्षेपणास्त्राचा वापर केला.

युक्रेन-रशिया युद्धाचे हे चौथे वर्ष आहे. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतीन Vladimir Putin यांनी "जगातील विद्यमान संरक्षण व्यवस्थांना रोखता न येणारे क्षेपणास्त्र" असा या क्षेपणास्त्राचा उल्लेख केला होता. त्यामुळे या क्षेपणास्त्राभोवती केवळ लष्करीच नव्हे तर सामरिक आणि भू-राजकीय उत्सुकताही वाढली आहे.

'ओरेश्निक' हे रशियाचे मध्यम पल्ल्याचे (Intermediate-Range) हायपरसॉनिक बॅलिस्टिक क्षेपणास्त्र आहे. 'ओरेश्निक' हा शब्द रशियन भाषेतील 'हेझल' वृक्षावरून आलेला आहे. रशियाच्या दाव्यानुसार हे क्षेपणास्त्र ३,००० ते ५,५०० किलोमीटर अंतरावरील लक्ष्यांवर मारा करू शकते. त्यामुळे युरोपातील अनेक भाग त्याच्या परिघात येतात. संरक्षणतज्ज्ञांच्या मते, हे क्षेपणास्त्र रशियाच्या RS-26 Rubezh या क्षेपणास्त्र तंत्रज्ञानावर आधारित आहे. RS-26 स्वतः RS-24 Yars या आंतरखंडीय क्षेपणास्त्राच्या लहान स्वरूपातील आवृत्ती मानले जाते.

ओरेश्निकची सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे ते पंरपरागत स्फोटके आणि अण्वस्त्रवाहू वॉरहेड दोन्ही प्रकार वाहून नेऊ शकते. याचा अर्थ असा की हे क्षेपणास्त्र अंदाजे १२,००० किमी प्रतितास यापेक्षा अधिक वेगाने जाऊ शकते.

### कीव्हवरचा हल्ला आणि त्यामागील संदेश

युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की Volodymyr Zelenskyy यांनी कीव्ह हेच या हल्ल्याचे प्रमुख लक्ष्य होते, असे म्हटले आहे. राजधानीसह इतर भागांवरही प्रहार झाले. दुसरीकडे, रशियाच्या संरक्षण मंत्रालयाने हा हल्ला रशियातील नागरी पायाभूत सुविधांवर झालेल्या कथित युक्रेनी कारवायांना उत्तर असल्याचा दावा केला. रशियाने या मोहिमेत ओरेश्निक, Iskander missile system, Kh-47M2 Kinzhal आणि 3M22 Zircon यांसारख्या विविध क्षेपणास्त्र प्रणालींचाही वापर केल्याचे सांगितले. यापूर्वी नोव्हेंबर २०२४ मध्ये युक्रेनमधील निप्रो Dnipro येथे आणि त्यानंतर जानेवारी २०२६ मध्ये ल्विव Lviv परिसरात ओरेश्निकचा वापर झाल्याचे सांगण्यात आले होते. आता तिसऱ्यांदा रशियाने या क्षेपणास्त्राचा वापर कीव्हवरील हल्ल्यासाठी केला.

# ‘अमरी’ बायोपिकमध्ये प्रियांका चोप्राची एंट्री



प्रियांका चोप्रा सुमारे 6 वर्षांनी एस.एस. राजामौली यांच्याकडून दिग्दर्शित ‘वाराणसी“ चित्रपटातून भारतीय चित्रपटसृष्टीत परतणार आहे. यात महेशबाबू मुख्य नायक असणार आहे. तर दुसरीकडे प्रियांका चोप्रा आता एका मोठ्या बायोपिकमध्ये दिसणार आहे. प्रियांका ही अमृता शेरगिल यांच्या बायोपिकचा हिस्सा ठरणार आहे. या चित्रपटाचे नाव ‘अमरी“ असेल. भारत आणि हंगेरीचे नागरिकत्व बाळगणाऱ्या अमृता शेरगिल विसाव्या शतकाच्या प्रारंभी सर्वात प्रख्यात चित्रकारांपैकी एक होत्या. मीरा नायर यांच्या दिग्दर्शनात तयार होणाऱ्या या चित्रपटात प्रियांका मुख्य भूमिकेत नसली तरीही महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखेत दिसून येणार आहे. मीरा नायर यांची हा चित्रपट भारतासोबत हंगेरी आणि फ्रान्समध्ये मोठ्या स्तरावर प्रदर्शित करण्याची योजना आहे. अमरी या चित्रपटात प्रियांकाने काम करावे अशी मीरा नायर यांचा आग्रह होता. याचमुळे त्यांनी मागील वर्षी प्रियांकाशी संपर्क साधला होता. प्रियांकाने काही दिवसांपूर्वी अमृतसरमध्ये स्वत:च्या हिस्स्याचे चित्रिकरणही केले आहे. या चित्रपटात तान्या मानिकतला मुख्य भूमिकेत आहे. हा चित्रपट मीरा नायर आणि प्रियांका यांचा पहिला एकत्रित चित्रपट आहे. प्रियांका ही हॉलिवूड आणि बॉलिवूड दोन्ही ठिकाणी सक्रीय आहे, त्याचप्रमाणे मीरा नायर एक इंडियन-अमेरिकन फिल्ममेकर आहे.



## 83 व्या वर्षीही ‘बिग बीं’चा

अमिताभ बच्चन यांचा चाहतावर्ग संपूर्ण जगभरात आहे. ८३ वर्षांचे अमिताभ बच्चन आजही तितक्याच ऊर्जेने व समर्पणाने काम करतात. त्यांच्याबरोबर काम करणारे सहकलाकार त्यांच्या वक्तशीरपणाचे, शिस्तबद्ध जीवनशैलीचे आणि कामाप्रतिच्या त्यांच्या सर्मर्पणाबद्दल नेहमीच बोलताना दिसतात. या रविवारी (२४ मे २०२६)लादेखील चाहत्यांनी अमिताभ बच्चन यांना भेटण्यासाठी त्यांच्या बंगल्याबाहेर गर्दी केली होती. अमिताभ बच्चन त्यांच्या चाहत्यांना भेटले. यावेळी त्यांना पांढऱ्या रंगाचे कपडे परिधान केले होते. अमिताभ बच्चन यांच्या भेटीचे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. अशाच एका व्हिडीओमध्ये एक चाहता चक्कर येऊन पडला असल्याचे पाहायला मिळत आहे. उन्हामुळे तो चक्कर येऊन पडल्याचे पाहायला मिळत आहे. त्याच्या आजूबाजूचे लोक त्याला पाणी वगैरे देऊन, मदत करताना दिसत आहेत. हा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. त्यावर अनेकांनी कमेंट्स केल्या आहेत.

# पूजा सावंतचा ग्लॅमरस जलवा



मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय आणि ग्लॅमरस अभिनेत्री पूजा सावंत पुन्हा एकदा तिच्या स्टायलिश लूकमुळे चर्चेत आली आहे. आपल्या अभिनयासोबतच फॅशन आणि सौंदर्यासाठी ओळखली जाणारी पूजा सोशल मीडियावरही कायम सक्रिय असते. नुकतेच तिने तिच्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवर काही खास फोटो शेअर केले असून, या फोटोंनी चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. या नवीन फोटोंमध्ये पूजा सावंतने काळ्या रंगाची अतिशय आकर्षक साडी परिधान केली आहे. या साडीवर पांढऱ्या आणि पिवळ्या रंगातील मोठ्या फुलांची सुंदर डिझाईन पाहायला मिळते. साधेपणातही ग्लॅमरस दिसणारा हा लूक चाहत्यांना खूपच आवडला आहे. काळ्या साडीमुळे पूजाचे सौंदर्य आणखी खुलून दिसत असल्याच्या प्रतिक्रिया सोशल मीडियावर पाहायला मिळत आहेत. या साडीसोबत पूजाने स्लीव्हलेस ब्लाऊज परिधान केला आहे. त्यामुळे तिचा संपूर्ण लूक अधिक बोल्ड आणि स्टायलिश दिसत आहे. याशिवाय तिने कानात मोठे सिल्व्हर झुमके आणि त्याला जोडलेली नाजूक हेअर चेन घातली आहे. या सिल्व्हर ज्वेलरीमुळे तिच्या लूकला एक वेगळीच एलिगंट स्टाईल मिळाली आहे. पूजाने या फोटोशूटमध्ये हलका मेकअप, मोकळे केस आणि आत्मविश्वासपूर्ण पोझेस दिल्या आहेत. तिच्या प्रत्येक फोटोत तिचा ग्लॅमरस अंदाज स्पष्टपणे दिसून येतो. सोशल मीडियावर चाहत्यांनी तिच्या फोटोंवर लाईक्स आणि कमेंट्सचा अक्षरशः पाऊस पाडला आहे. अनेकांनी “खूप सुंदर”, “मराठमोळी क्वीन”, “ब्लॅक ब्युटी” अशा प्रतिक्रिया दिल्या आहेत. पूजा सावंत ही मराठी चित्रपटसृष्टीतील आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक मानली जाते. अभिनयासोबतच तिच्या फॅशन सेन्सचीही कायम चर्चा होत असते. पारंपरिक लूक असो किंवा मॉडर्न स्टाईल, प्रत्येक अंदाजात पूजा चाहत्यांचे लक्ष वेधून घेते. तिचे हे नवीन फोटो सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. विशेषतः काळ्या साडीतील तिचा एलिगंट आणि ग्लॅमरस अवतार चाहत्यांना खूपच भावला आहे. सिल्व्हर ज्वेलरी आणि हटके स्टाइलिंगमुळे पूजाचा हा लूक सोशल मीडियावर ट्रेंड होताना दिसत आहे.

# भारतीय क्रिकेटवर शोककळा !

## ३९ वर्षीय भारताच्या क्रिकेटपटूचं आकस्मिक निधन

**महाईन्यूज** । बंगळूरू

**भारतीय क्रिकेटसाठी फारच धक्कादायक बातमी समोर आली आहे. क्रिकेट खेळत असताना हृदयविकाराच्या झटक्याने खेळाडूचं निधन झालं. बंगळूरु येथे स्थानिक विभागीय क्रिकेट सामन्यादरम्यान हृदयविकाराचा झटका आल्याने कर्नाटकचे माजी रणजी क्रिकेटपटू एस. एल. अक्षय यांचे निधन झाल्याचे वृत्त आहे. शिवमोग्गा येथील रहिवासी असलेले ३९ वर्षीय अक्षय यांनी यापूर्वी रणजी ट्रॉफीमध्ये कर्नाटकचे प्रतिनिधित्व केलं होतं आणि ते कर्नाटक प्रीमियर लीगमध्येही खेळले होते, जी आता महाराजा ट्रॉफी केएससीए टी-२० म्हणून ओळखली जाते.**



घटना घडली तेव्हा अक्षय हे केएससीए तिसऱ्या विभागातील सामन्यात सॅफायर सीसीकडून खेळत होते. त्यांनी चार षटके टाकल्यानंतर अस्वस्थ वाटत असल्याची तक्रार केली. त्यानंतर त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात नेण्यात आलं. मात्र, डॉक्टरांच्या प्रयत्नांनंतरही त्यांना मृत घोषित करण्यात आलं. एस. एल. अक्षय हे २०१४-१५ रणजी ट्रॉफी विजेत्या कर्नाटक संघाचा भाग होते. देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्यांनी आपल्या वेगवान गोलंदाजीने विशेष छाप सोडली होती. त्यांच्या अचानक निधनामुळे कर्नाटक क्रिकेट वर्तुळात शोककळा पसरली आहे.

"अक्षय यांनी प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये कर्नाटकचे अत्यंत उल्लेखनीय प्रतिनिधित्व केलं. खेळाडू म्हणून कारकीर्द संपल्यानंतरही त्यांनी क्रिकेटप्रती असलेली निष्ठा आणि जिद्द कायम ठेवली. कनिष्ठ स्तरावरील प्रशिक्षक म्हणून त्यांनी अनेक युवा क्रिकेटपटूंना घडवण्यात आणि मार्गदर्शन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. राज्यातील क्रिकेट प्रतिभा विकसित करण्यात त्यांचे योगदान कायम स्मरणात राहील," असं केएससीएने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.




# वैभव सूर्यवंशीचं अवघ्या २५ चेंडूत शतक! पीटरसनच्या शोमध्ये 'बॉस बेबी'चा जलवा

**महाईन्यूज** । नवी दिल्ली

**वैभव सूर्यवंशी म्हणजे षटकारांची आतिषबाजी हे निश्चित! आता वैभवने अवघ्या २५ चेंडूत शतक झळकावत सर्वांचं पुन्हा एकदा लक्ष वेधलं आहे. वैभव सूर्यवंशीचा संघ राजस्थान रॉयल्सने आयपीएल २०२६च्या प्लेऑफमध्ये धडक मारली आहे. अखेरच्या गट सामन्यात राजस्थानने मुंबईचा पराभव करत प्लेऑफ गाठलं. आता संघाचा एलिमिनेटर सामना सनरायझर्स हैदराबादविरूद्ध होणार आहे. यापूर्वी वैभवच्या या वादळी शतकी खेळीचा व्हीडिओ व्हायरल होत आहे.**




इंग्लंडचा माजी खेळाडू केविन पीटरसनचा युट्युब व्हीडिओ सध्या गाजतोय. केविन पीटरसनने 'द स्विच' या त्याच्या यूट्यूब चॅनलवर २५ मे रोजी वैभव सूर्यवंशीचा समावेश असलेला एक एपिसोड अपलोड केला आणि त्याला लगेचच प्रचंड लाईक्स मिळाले. या एपिसोडमध्ये केविन पीटरसनने त्याला ५० चेंडूंमध्ये शतक करण्याचं आव्हान दिलं होतं, परंतु वैभव सूर्यवंशीने हे आव्हान केवळ २५ चेंडूंमध्येच पूर्ण केलं.

वैभव सूर्यवंशी या व्हीडिओमध्ये फलंदाजी करत आहे. तर समोर ध्रुव जुरेल बॉलिंग मशीनवरून गोलंदाजी करत आहे. बॉलिंग मशीनमधील जवळपास येणाऱ्या प्रत्येक चेंडूवर वैभव मोठा फटका खेळू पाहत होता. या बॉलिंग मशीनमधून येणाऱ्या प्रत्येक चेंडूचा वेग मात्र वेगळा होता. ५० किमीप्रति तास ते १०० किमी प्रति तासच्या वेगाचे हे चेंडू होते. त्याने अवघ्या ११ चेंडूत आपलं अर्धशतक पूर्ण केलं. यादरम्यान मैदानावर अनेक फिल्डर होते, पण वैभवने खेळलेल्या चेंडूचा झेल मात्र कोणी टिपू शकले नाहीत. यासह वैभवने २५ चेंडूत आपलं शतक पूर्ण केलं. पण श्रेयस अय्यरचा विक्रम मात्र तो मोडू शकला नाही.

पीटरसनच्या शोमध्ये सर्वात जलद शतकं करणाऱ्यांच्या यादीत वैभव दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्याच्यापाठोपाठ वेस्ट इंडिजचा निकोलस पूरन आहे, ज्याने २८ चेंडूंमध्ये आपलं शतक पूर्ण केलं. एबी डिव्हिलियर्सने ३० चेंडूंमध्ये, तर यशस्वी जैस्वालने आपले शतक पूर्ण करण्यासाठी ४७ चेंडू घेतले.

वैभव सूर्यवंशीच्या खेळीदरम्यान, केविन पीटरसनने त्याला काही प्रश्न विचारले, ज्यांची त्याने उत्तरं दिली. पीटरसनने वैभवला विचारलं, त्याला काय जास्त आवडतं, प्रथम फलंदाजी की धावांचा पाठलाग करणं. वैभवने उत्तर दिलं, "दोन्ही." त्यानंतर पीटरसनने त्याला विचारलं, "जेव्हा तू ९० धावांच्या आसपास खेळत असतोस, तेव्हा मनात काय विचार येतात?" वैभवने उत्तर दिलं, "मी फक्त माझा नैसर्गिक खेळ खेळण्यावर लक्ष केंद्रित करतो. "पीटरसनने वैभव सूर्यवंशीला त्याची सर्वात मोठी खेळी कधी खेळली, असंही विचारलं. त्यावर वैभव म्हणाला की, एका देशांतर्गत सामन्यात त्याने एकट्याने ५० षटकं फलंदाजी करून ३५३ धावा केल्या होत्या.

### सूर्यवंशीचं २५ चेंडूत शतक

वैभव सूर्यवंशीने षटकारांचा पाऊस पाडत अवघ्या २५ चेंडूंमध्ये १४ षटकारांसह आपलं शतक पूर्ण केलं. मात्र, केविन पीटरसनच्या शोमधील सर्वात जलद शतकाचा श्रेयस अय्यरचा विक्रम तो मोडू शकला नाही. श्रेयस अय्यरने केविन पीटरसनच्या शोमध्ये अवघ्या २२ चेंडूंमध्ये शतक झळकावलं होतं. याचा अर्थ, वैभव सूर्यवंशीने श्रेयस अय्यरचा विक्रम तीन चेंडूंनी मोडण्याची संधी गमावली. मात्र, जेव्हा केविन पीटरसनने त्याला शोमध्ये विचारले, तेव्हा त्याने अय्यरचा विक्रम मोडणार असल्याचे सांगितले होते, पण तसं घडलं नाही.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज
ePaper
epaper.mahaenews.com
। मंगळवार ।
दि. 26 मे 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# तरुणीची छेडछाड करणाऱ्या विकृताला अटक

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

**बस थांब्यावर बसची वाट पाहत उभ्या असलेल्या तरुणीसमोर अश्लील कृत्य करणाऱ्या आरोपीला पिंपरी पोलिसांनी ८० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी करुन बूट (शूज) आणि टी-शर्टच्या रंगावरुन अटक केली. चिंचवडेनगर येथून आरोपीला पकडण्यात आले आहे.**

याप्रकरणी संबंधीत तरुणीने पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयानंद पाटील यांनी माहिती दिली. फिर्यादी संबंधित २४ वर्षीय तरुणी २१ मे रोजी सकाळी कामावर जाण्यासाठी घरातून निघाली होती. चिंचवडमधील मदर तेरेसा उड्डाणपुलावरील एम्पायर इस्टेट बीआरटी बस थांब्यावर तरुणी कंपनीच्या बसची वाट पाहत उभी होती. बस थांब्यावर तरुणी एकटीच होती. काही वेळाने एक अनोळखी व्यक्ती तिथे आला. त्या व्यक्तीने संबंधित तरुणीकडे पाहत सार्वजनिक ठिकाणी अश्लिल वर्तन केले. तरुणीचा विनयभंग केला. त्यानंतर तेथून पळून गेला.

## अखेर असा सापडला आरोपी

आरोपीचे नाव निष्पन्न नव्हते. त्याने पळून जाताना रस्त्याने कपडेही बदलले होते. त्यामुळे शोध घेण्याचे मोठे आव्हान होते. एम्पायर इस्टेट परिसरातील ८० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी केली. आरोपीचा शूज आणि टी-शर्टचा रंग सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दिसला होता. त्याच्या आधारे त्याचा शोध घेतला. चिंचवडेनगर येथून त्याला ताब्यात घेतले आहे. ४८ तासात त्याला अटक केली असून पोलीस कोठडीत आहे. आरोपी ४३ वर्षांचा असून तो बाऊन्सर म्हणून काम करत आहे. प्राथमिक तपासात त्याच्यावर पूर्वीचा कोणताही गुन्हा दाखल नाही. त्याचा पूर्व इतिहास तपासला जात आहे. असा कोणताही प्रसंग असल्यास महिलांनी तत्काळ पोलिसांशी संपर्क साधावा. पोलीस नेहमीच महिलांच्या सुरक्षिततेसाठी सतर्क, तत्पर आहेत, असे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयानंद पाटील यांनी केले.





# पवना धरणातील पाणीसाठा २५ टक्क्यांवर

## पिंपरी-चिंचवडवर पाणीटंचाईचे सावट; वाढत्या उन्हामुळे पाणीसाठ्यात झपाट्याने घट

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणारा मावळातील पवना धरणाचा जलसाठा वेगाने कमी होत आहे. धरणात केवळ २५ टक्के पाणीसाठा शिल्लक असून, पाऊस लांबणीवर पडल्यास शहराला पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. पिंपरी-चिंचवड शहरासह नगरपालिका, ग्रामपंचायत तसेच, एमआयडीसीला पवना धरणातून पाणी दिले जाते.**



महापालिका पवना धरणातून सोडलेले पाणी पवना नदीवरील रावेत येथील बंधाऱ्यातून उचलते. दररोत ५५० एमएलडी अशुद्ध पाणी उपसा करून ते प्राधिकरण, निगडी येथील सेक्टर क्रमांक २३ येथील जलशुद्धीकरण केंद्रात शुद्धीकरण प्रक्रिया करून संपूर्ण शहराला पुरवठा केल जातो. प्रचंड उष्णतेमुळे बाष्पीभवन होऊन पवना धरणातील पाणीसाठा वेगात कमी होत आहे. धरणात रविवारी केवळ २५ टक्के पाणी साठा शिल्लक होता.

धरणाचे पात्र मोठ्या प्रमाणात कोरडे पडत आहे. त्या भागातून गाळ काढून शेतकरी नेत आहेत. धरणातील पाणीसाठा पिंपरी-चिंचवड शहराला जून महिन्यापर्यंत पुरेल असा दावा महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी केला आहे. मात्र, पाऊस लांबणीवर पडल्यास शहराला पाणीटंचाईस सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे शहरातील नागरिकांनी उपलब्ध पाणी साठ्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन अधिकाऱ्यांनी केले आहे.

मान्सून वेळेत आणि समाधानकारक झाल्यास परिस्थिती नियंत्रणात राहू शकते. मात्र, पाऊस लांबल्यास शहरातील पाणीपुरवठ्यावर निर्बंध येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### आंद्रा धरणात ३० टक्के पाणीसाठा

मावळ तालुक्यातील आंद्रा धरणात सध्या ३० टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. आंद्रा पाणी योजनेतून महापलिकेकडून निघोजे येथील इंद्रायणी नदी बंधाऱ्यातून दररोज ९० एमएलडी पाणी उचलले जाते. ते पाणी अधिक दूषित असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. त्यामुळे महापालिकेस पाणी शुद्धीकरणावर अधिकचा खर्च करावा लागत आहे.

## दुकानांसमोरील अतिक्रमण १५ दिवसांत हटवा, अन्यथा कारवाई!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पदपथावरील अतिक्रमण काढण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. पदपथ हे नागरिकांना चालण्यासाठी असतात, त्यामुळे कोणत्याही पदपथावर अतिक्रमण करणाऱ्यांविरूद्ध महापालिकेच्या वतीने कठोर कारवाई केली जाईल. तसेच काही दुकानदार आपल्या दुकानापुढे अतिक्रमण करून साहित्य ठेवतात. त्यामुळे रहदारीला अडथळा निर्माण होऊन नागरिकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत असल्याने अशा दुकानधारकांनी येत्या १५ दिवसांत असे अतिक्रमण कायमस्वरूपी हटवावे अन्यथा महापालिकेच्या वतीने कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिला.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी क्षेत्रीय कार्यालयनिहाय अतिक्रमण कारवाईच्या कामकाजाचा आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे, सहशहर अभियंता बापूसाहेब गायकवाड, प्रेरणा सिनकर, मनोज सेठिया, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे, उप आयुक्त सचिन पवार, डॉ. प्रदीप ठेंगल, राजेश आगळे, व्यंकटेश दुर्वास, कार्यकारी अभियंता महेश बरीदे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, मुख्य उद्यान अधिक्षक महेश गारगोटे यांच्यासह क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे, राजाराम सरगर, अश्विनी गायकवाड, परशुराम वाघमोडे, अतुल पाटील, पुजा दुधनाळे, मुकेश कोळप आदी उपस्थित होते.

महापालिकेने सर्व क्षेत्रीय कार्यालयांअंतर्गत अतिक्रमणमुक्त पदपथ मोहीम हाती घेतली आहे. नागरिकांना चालण्यासाठी विनाअडथळा पदपथ असावेत याकडे महापालिकेने लक्ष केंद्रित केले असून शहरातील पदपथ अतिक्रमणमुक्त केले जात आहेत. ही मोहीम राबविताना पुन्हा त्याच जागी अतिक्रमण होणार नाही याची दक्षता सर्व संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घेणे गरजेचे आहे. सर्व क्षेत्रीय कार्यालयनिहाय हॉकर्ससाठी जागा निश्चित करून त्याठिकाणी हॉकर्स झोन तयार करावा. शहरात बकालपणा वाढणार नाही, तसेच हॉकर्समुळे रहदारीला अडथळा निर्माण होणार नाही यासाठी सर्व क्षेत्रीय कार्यालयनिहाय फिरते पथक नेमून त्यावर सातत्याने देखरेख ठेवावी, असे निर्देश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले.



## तडीपार आरोपीकडून धारदार कोयता जप्त; निगडीत गुन्हा दाखल

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

निगडी परिसरात तडीपार आदेशाचे उल्लंघन करत फिरणाऱ्या आरोपीला गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले असून त्याच्याकडून धारदार लोखंडी कोयता जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी निगडी पोलीस ठाण्यात भारतीय शस्त्र अधिनियम आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २४ मे २०२६ रोजी सकाळी ११.२५ वाजण्याच्या सुमारास संग्रामनगर झोपडपट्टी, अंकुश चौकाजवळ, ओटास्किम, निगडी येथे कारवाई करण्यात आली. या प्रकरणी पोलीस हवालदार जयवंत जगन्नाथ राऊत (गुन्हे शाखा युनिट ०१) यांनी फिर्याद दिली आहे.

आरोपी आयुब चमन खान (वय २८, रा. संग्रामनगर झोपडपट्टी, निगडी) याला ताब्यात घेण्यात आले आहे. संबंधित आरोपीवर यापूर्वी तडीपारची कारवाई करण्यात आली होती. मात्र, तडीपार आदेश लागू असतानाही तो निगडी परिसरात फिरताना आढळून आला. तपासादरम्यान आरोपीकडे सुमारे ३०० रुपये किंमतीचा धारदार लोखंडी कोयता विनापरवाना बाळगलेला आढळला.

या प्रकरणी निगडी पोलीस ठाण्यात भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ४ (२५) तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१)(३), १३५ व १४२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हवालदार सानप करत आहेत.

# 'आयआयबीएम'चा कौतुकास्पद पुढाकार!

## हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंटच्या माध्यमातून सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना मिळणार यशाची गगनभरारी

हॉस्पिटॅलिटी क्षेत्रामध्ये खाजगी व सरकारी नोकरी ही मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाले आहे शिक्षण हे केवळ पदवी मिळवण्याचे साधन नसून, ते विद्यार्थ्याला स्वतःच्या पायावर उभे करणारे हवे. आजच्या स्पर्धात्मक युगात सर्वसामान्य, शेतकरी, मुस्लिम समाज आणि गोरगरीब कुटुंबातील मुला-मुलींना उच्च दर्जाचे व्यावसायिक शिक्षण देऊन त्यांना जागतिक पातळीवर सक्षम करणे, हाच एकमेव उद्देश डोळ्यासमोर ठेवून 'आय आय बी एम कॉलेज ऑफ हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट, चिखली' अविरतपणे कार्यरत आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. धनंजय वर्णेकर यांच्या दूरदृष्टीतून सुरू झालेला हा प्रवास आज हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला नवी दिशा देत आहे.

पालकांनो आणि विद्यार्थ्यांनो, संधी ओळखा!

आज एअरपोर्ट मॅनेजमेंट, शिप मॅनेजमेंट, हॉटेल मॅनेजमेंट, बिझनेस मॅनेजमेंट आणि इव्हेंट मॅनेजमेंट यांसारख्या अनेक कोर्सेसना जगभरात प्रचंड मागणी आहे. हे सर्व अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्या अंगभूत कौशल्यांवर (Skills) आधारित आहेत. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे, कमीत कमी फीमध्ये विद्यार्थी या क्षेत्रात उच्च पातळीवर पोहोचू शकतात. यासाठी शासकीय स्कॉलरशिप आणि सरकारी नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. परंतु, दुर्दैवाने ग्रामीण व सर्वसामान्य भागातील विद्यार्थी आणि पालकांपर्यंत याची पुरेशी माहिती पोहोचत नाही.

'स्कील'च्या जोरावर स्वप्नपूर्ती!

विमानात दिमाखात काम करणारी हवाई सुंदरी (Air Hostess) असो किंवा मोठ्या जहाजावर (Ship) काम करणारा शेफ असो, हे सर्व केवळ आणि केवळ योग्य कौशल्यांच्या जोरावर घडत आहे. 'घरची आर्थिक परिस्थिती बेताची आहे, फी भरायला पैसे नाहीत' म्हणून कोणत्याही विद्यार्थ्याने आता घरी बसण्याची किंवा शिक्षण सोडण्याची गरज नाही. हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट हे एक असे क्षेत्र आहे, जे आर्थिक अडचणींवर मात करून विद्यार्थ्यांना यशाचे शिखर गाठण्याची हमी देते.

अधिकृत आणि नामांकित शिक्षण

'आय आय बी एम' (IIBM) संस्थेला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (SPPU), कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ (नागपूर) आणि महाराष्ट्र बोर्डाची अधिकृत मान्यता आहे. त्यामुळे येथील शिक्षणाचा दर्जा आणि प्रमाणपत्राला जागतिक स्तरावर मोठी किंमत आहे. गेल्या १५ वर्षांपासून मी HOD पदावर मी संस्थेत काम करत आहे, माझ्या मार्गदर्शनाखाली भरपूर विद्यार्थी घडवले त्यांना परदेशापर्यंत पोहोचवलं गोरगरीब घरातील मुलं आज मोठं नाव कमवत आहेत मुस्लिम समाजातील मुली बाहेर पडत नाहीत त्याही प्रदेशापर्यंत पोहोचवल्या, विद्यार्थी घडवणे हा एकच उद्देश कायम राहील.

रोजगाराची सुवर्णसंधी आणि लाखो रुपयांचे पॅकेज

आज पर्यटन क्षेत्र (Tourism), हॉटेल इंडस्ट्री, एअरलाइन्स आणि मरीन शिपिंग या क्षेत्रांचा विस्तार अफाट वाढला आहे. परिणामी, या क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या लाखो नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. आजपर्यंत 'आयआयबीएम'मधून हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंटचे शिक्षण पूर्ण केलेले शेकडो विद्यार्थी देश-विदेशात मोठ्या पदांवर कार्यरत असून लाखो रुपयांचे वेतन घेत आहेत.

थोडक्यात सांगायचे तर,




सर्वसामान्य घरातील विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी 'आय आय बी एम' संस्था कटिबद्ध आहे. या संस्थेमध्ये टाकलेले पहिले पाऊल, हे तुमच्या १००% यशाचे पाऊल असेल यात शंका नाही!

**- अमोल भागवत**
**(विभागप्रमुख HOD)**

## पर्यावरणीय शाश्वतता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित महा रोजगार मेळावा २०२६ ला उत्स्फूर्त प्रतिसाद

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**डी वाय पाटिल इन्स्टिट्युट ऑफ मास्टर ऑफ कॉम्पुटर अँप्लिकेशन अँड मॅनेजमेन्ट आकुर्डी, पुणे येथे दिनांक २२ मे २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या “महा रोजगार मेळावा २०२६” या उपक्रमाने पर्यावरणीय शाश्वतता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित कॅम्पस भरती प्रक्रियेसाठी एक नवा आदर्श निर्माण केला.**



हा रोजगाराभिमुख उपक्रम वर्षातील सर्वात प्रगत आणि भविष्याभिमुख उपक्रमांपैकी एक ठरला असून, यामध्ये भरती अधिकारी, उद्योग प्रतिनिधी आणि करिअरच्या संधी शोधणारे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. टॅलेंनलीओ यांच्या अधिकृत तांत्रिक सहकार्याने आयोजित या कार्यक्रमातून शैक्षणिक संस्था नवकल्पना, पर्यावरणीय जबाबदारी आणि महा भरती प्रक्रिया यांचा यशस्वी संगम कसा साधू शकतात, हे प्रभावीपणे दाखवून देण्यात आले.

या जॉब फेअरमुळे विद्यार्थ्यांना थेट भरती अधिकाऱ्यांशी संवाद साधण्याची, उद्योग क्षेत्रातील सध्याच्या अपेक्षा जाणून घेण्याची आणि विविध क्षेत्रांतील करिअर संधींचा अभ्यास करण्याची मौल्यवान संधी मिळाली. हा उपक्रम केवळ रोजगार मेळावा न राहता, तंत्रज्ञान आणि पर्यावरणीय शाश्वतता यांचा प्रभावी संगम साधणारा एक आदर्श मॉडेल ठरला असून, भविष्यातील कॅम्पस भरती प्रक्रियेसाठी तो शैक्षणिक संस्थांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे.


या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन हे डॉ डी वाय पाटील शैक्षणिक संकुल आकुर्डी यांच्या पर्यावरणीय शाश्वतता आणि जबाबदार संस्थात्मक कार्यपद्धतीप्रती असलेल्या दृढ बांधिलकीचे प्रतीक आहे.

### कार्यक्रमाची वैशिष्ट्ये

- ४२ कंपन्यांच्या एच आर प्रतिनिधींनी सहभाग नोंदविला
- १८०० हून अधिक ऑनलाइन नोंदण्या प्राप्त झाल्या
- ९११ विद्यार्थी प्रत्यक्ष उपस्थित राहिले

### पूर्णतः कागदविरहित आणि शाश्वत उपक्रम

विद्यार्थी नोंदणी, डिजिटल रिझ्युमे, क्युआर-कोड आधारित प्रवेश व्यवस्था, मुलाखतींचे वेळापत्रक तसेच कंपन्यांमधील समन्वय या सर्व प्रक्रिया एकात्मिक डिजिटल प्रणाली आणि कृत्रिम बुद्धिमत्ता सक्षम तंत्रज्ञानाद्वारे पार पाडण्यात आल्या. संस्थेच्या संचालिका डॉ. के निर्मला कुमारस्वामी यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थी स्वयंसेवक आणि तांत्रिक टीमने स्मार्ट तंत्रज्ञानाचा वापर करून उमेदवार व कंपन्यांचे व्यवस्थापन अत्यंत सुरळीतपणे केले. रोजगार मेळावा २०२६ ला मिळालेला प्रतिसाद हा उद्योग-शैक्षणिक सहकार्य आणि रोजगाराभिमुख उपक्रमांविषयी वाढत्या गरजेचे द्योतक ठरला.


PRIYADARSHANI SCHOOL & JR. COLLEGE
MOSHI
43 YEARS OF NURTURING VALUES, EXCELLENCE AND TOMORROW'S LEADERS.
ADMISSIONS OPEN 2026-27
Nursery to Grade 5
WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?
43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation
+91 9890613333 | +91 9373073077
pgosm05@gmail.com
www.priyadarshanischoolmoshi.in